# प्रेसनोट

दि.१७/०४/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | घारगांव पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.१२४/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) खाजगी इसम रमजान नजीर शेख, वय–२८ वर्ष, व्यवसाय–पत्रकारीता व शेती, रा.मांडवे, ता.संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर<br>२) अक्षय बाबाजी ढोकळे, तलाठी सजा मांडवे, वर्ग–३, ता.संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर रा.खडकवाडी, ता.पारनेर, जिल्हा अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ७,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, आरोपी खाजगी इसम रमजान नजीर शेख यांनी तक्रारदार यांचेकडील खडी वाहतुकीचे ट्रक सुरळीत सुरु ठेवण्यासाठी व त्यावर कुठलीही कारवाई न करण्यासाठी दरमहा ४०,०००/– रुपये द्यावे लागतील असे आरोपी लोकसेवक अक्षय ढोकळे, तलाठी यांनी सांगितले आहे असे सांगुन तक्रारदार यांचेकडे लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी आरोपी खाजगी इसम शेख यांचे बरोबर पुन्हा आरोपी लोकसेवक ढोकळे यांची भेट घेवुन खडी ट्रक वाहतुकीबाबत चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक ढोकळे यांना सांगितले की, मी तुम्हाला ५०,०००/– रुपये देतो पण मला कुठलाही त्रास झाला नाही पाहिजे असे सांगितले असता आरोपी लोकसेवक ढोकळे म्हणाले की, घेतो मी, पण तुम्हाला दोन महिनेच ट्रक चालवता येतील असे म्हणुन लाच स्वीकृतीस संमती देवुन लाच स्वीकारण्याचे मान्य केले.<br>त्यानंतर दि.१६/०४/२०२५ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी खाजगी इसम शेख यांनी ५०,०००/– रुपये लाच रक्कम पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडुन स्वीकारली व लाच रक्कम स्वीकारल्यानंतर सापळा पथक व दोन्ही पंचासमक्ष त्यांचे मोबाईल फोनवरुन तलाठी अक्षय ढोकळे यांचे मोबाईलवर फोन करुन तक्रारदार यांनी पैसे दिले आहे ५०,०००/– रुपये, काय करु असे सांगितले असता आरोपी लोकसेवक ढोकळे यांनी बघु उदया असे म्हणुन आरोपी शेख यांनी स्वीकारलेल्या लाचेच्या रकमेस संमती दर्शवुन प्रोत्साहन दिले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर